**प्रेसनोट** दि. 17/12/2025

## ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणेकडून जेजुरी पोलीस स्टेशन येथील पोलीस हवालदार व खाजगी इसम यांचे विरोधात लाचमागणी प्रकरणी कारवाई केलेबाबत.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | जेजुरी पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.रजि.नं. 410/2025 |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7, 7अ,12 |
| तक्रारदार | पुरुष वय 59 वर्षे, व्यवसाय-कापड व्यवसाय |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | 1)दशरथ शिवाजी बनसोडे,वय 57 वर्ष, व्यवसाय नोकरी पद पोलीस हवालदार, जेजुरी पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण रा.ठी. साळुंखे बिल्डिंग,बडोदा बँकेच्या शेजारी,मोरगाव रोड,जेजुरी ता.पुरंदर जि. पुणे, (वर्ग 3)<br>2) सचिन अरविंद चव्हाण रा.ठी. चव्हाण वस्ती, वाल्हा,ता. पुरंदर जि.पुणे. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | एकुण 2,000/- (दोन हजार रूपये फक्त) |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी | एकुण 2,000/- (दोन हजार रूपये फक्त) |
| पडताळणी दिनांक | दि. 10/12/2025 |
| सापळा अधिकारी यांचे नाव व पद | श्रीमती भारती मोरे, सहा.पोलीस आयुक्त, लाप्रवि,पुणे (मो.क्र. 9870156586) |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्रीमती शैलजा शिंदे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 7722011255) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार यांचे मुलाने सन 2019 मध्ये एका इसमाविरोधात जेजुरी पोलीस ठाणे येथे सावकारकीच्या कायद्याखाली गुन्हा दाखल केला होता त्या गुन्ह्यामध्ये तक्रारदार व तक्रादाराची पत्नी असे दोन साक्षीदार होते. दि.5/12/2025 रोजी पोलीस सचिन चव्हाण व पोलीस दशरथ बनसोडे हे तक्रारदाराच्या घरी आले होते तेव्हा त्यांनी तक्रारदार व तक्रारदाराची पत्नी विरुद्ध सन 2019 मध्ये तक्रारदाराच्या मुलाने दाखल केलेल्या गुन्ह्यामध्ये गेट वॉरंट निघालेले असून ते रद्द करण्यासाठी दोन हजार रुपयाची लाच मागितल्याची तक्रार तक्रारदार यांनी दि.10/12/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे दिली.

तक्रारदाराच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. 10/12/2025 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक पोलीस हवालदार बनसोडे यांनी तक्रारदाराकडे त्यांच्या व त्यांची पत्नी विरुद्ध निघालेले जामीनपात्र वॉरंट रद्द करून देण्यासाठी 2 हजार रुपयाची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले तसेच पोलीस सचिन चव्हाण (नंतर खाजगी इसम म्हणून निष्पन्न झाले) याने तक्रारदारास लाच देण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले असून दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध जेजुरी पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण येथे गु.र.क्र. 410/2025, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7,7अ,12 नुसार गुन्हा दाखल केला आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, **9403781064**
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक** - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन ॲप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in

17/12/25

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.